प्रकरण पाचवे

# उपसंहार

# प्रकरण पाचवे
# उपसंहार

१९८० नंतरच्या कालखंडात आपल्या उल्लेखनीय काव्यनिर्मितीमुळे नारायण सुमंत यांना प्रथितयश ग्रामीण कवी म्हणून ओळखले जाते. त्यांचे एकूण चार काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. कृषकांच्या दु:खाला वाचा फोडण्याचे काम सुमंतांची संपूर्ण गेय कविता करते. मराठी कवितेच्या इतिहासामध्ये शेतकऱ्यांच्या बाबतीत ताकदीची कविता लिहिणारे कवी म्हणून नारायण सुमंत परिचित आहेत. त्यांचा 'नारायण पासष्टी' हा काव्यसंग्रह संपूर्ण गेय कवितांचा आहे. या कवितांमध्ये लय, नाद, ताल, यमकानुप्रास, संगीतानुकूलता ओतप्रोत भरलेली आहे. त्यामुळे ही गेय कविता शेतकऱ्यांचे दु:ख मांडणारी, त्यांना बंड करण्यास प्रवृत्त करणारी असल्यामुळे १९८० नंतरच्या कालखंडात महत्त्वपूर्ण आहे.

प्रस्तुत लघुप्रबंधात **'नारायण सुमंत यांच्या गेय कवितेचा अभ्यास'** ('नारायण पासष्टी' च्या अनुषंगाने) हा एकूण पाच प्रकरणांमध्ये करण्यात आलेला आहे. याचा आढावा प्रस्तुत **'उपसंहार'** या प्रकरणात मांडला आहे.

प्रस्तुत लघुप्रबंधात **'मराठी गेय कवितेचे स्वरूप आणि वाटचाल'** या पहिल्या प्रकरणामध्ये मराठी गेय कवितेचे स्वरूप व वाटचाल अभ्यासली आहे. मराठी गेय कवितेचे स्वरूप अभ्यासत असताना गेय कवितेची संकल्पना स्पष्ट केली आहे. नादवती शब्दांची क्रमबद्ध, सूर, ताल, लय यांनी युक्त गाऊन व्यक्त होण्याची ओढ असणारी प्रतिमांची सेंद्रिय संघटनात्मक रचना म्हणजे गेय कविता होय. गेय कवितेत गेयता ही अपरिहार्य असते. शब्दांची क्रमबद्धता, लय, स्वरप्रधानता, ताल या संपूर्ण घटकांच्या परस्पर अवलंबनातूनच गेय कविता आपले स्वत्व सांभाळते. गेय कवितेचा रचनाबंध हा विविधांगी असलेला दिसून येतो. गेय कवितेचे लयबद्धता, लघुता,

आवाहकता, सूचकता, श्रवणीयता, व्यापक जीवनाशय, सहजता व कलात्मकता, अंत:संगीत हे विशेष महत्त्वाचे आहेत. अशा गेय कवितेचे सादरीकरणही केले जाते. विविध विषयाला अंगिकारणारी ही गेय कविता आपले वेगळेपण जपून आहे. ती उत्तरोत्तर समाजाभिमुख होताना दिसते.

मराठी गेय कवितेची वाटचाल पाहत असताना गेय कवितेचा आरंभ लोकवाङ्मयात झाल्याचे स्पष्ट होते. मराठी गेय कवितेने महानुभाव वाङ्मय, संतवाङ्मय, शाहिरी वाङ्मय यांचा प्रभाव पचवत अर्वाचीन कालखंडात प्रवास केलेला दिसून येतो. अर्वाचीन मराठी गेय कवितेत केशवसुतकालीन गेय कविता, रविकिरण मंडळकालीन गेय कविता, साठोत्तर गेय कविता असे तिचे टप्पे आहेत. आजपर्यंत तिने अनेक बदल स्वीकारत आपले अस्तित्व टिकवून ठेवले आहे. मनोरंजनाबरोबर संतांनी केलेले कार्य ही कविता करत आहे. आपल्या गुणवत्तेच्या जोरावर, सादरीकरणातील प्रभावीपणे व्यक्त होण्यावर तिने रसिकांना व वाचकांना मंत्रमुग्ध केले आहे. महदंबा, ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ यांच्या रचना गेय स्वरुपातल्या आहेत. रामजोशी, अनंत फंदी यासारख्या शाहिरांची रचनाही गेय स्वरुपाची आहे. पुढे केशवसुत, गोविंदाग्रज, बालकवी, गिरीश, यशवंत, भा. रा. तांबे, बा. भ. बोरकर यांच्या रचनाही गेय आहेत. त्यानंतर बहिणाबाई चौधरी, कुसुमाग्रज, मंगेश पाडगावकर, सुरेश भट, ना. धों. महानोर, विठ्ठल वाघ याबरोबरच अलिकडे इंद्रजित भालेराव, प्रकाश घोडके, प्रकाश होळकर यासारखे कवी गेय कविता लिहित आहेत. अशा अनेक कवींनी गेय रचना करून हा प्रवाह आजतागायत चालू ठेवला आहे. अशा पद्धतीने गेय कवितेचे स्वरूप आणि वाटचाल पहिल्या प्रकरणात अभ्यासली आहे.

**'नारायण सुमंत यांच्या गेय कवितेची आशयसूत्रे'** या दुसऱ्या प्रकरणात 'नारायण पासष्टी' मधील कवितेची आशयसूत्रे अभ्यासण्यात आली आहेत. नारायण सुमंत यांची कविता कृषिजीवनाला वाहिलेली आहे. त्यांच्या गेय कवितेची आशयसूत्रे

अभ्यासत असताना प्रकरणाच्या आरंभी नारायण सुमंत यांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून दिला आहे. ते कृषक कवी आहेत. त्यांनी चित्रपटातही काम केले आहे. त्यांना अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. त्यांच्या गेय कवितेत काही आशयसूत्रे आढळतात. त्यांच्या गेय कवितांतून निसर्गाची विविध रूपे दिसून येतात. शेतशिवार आणि पंढरी यांचे अतूट नाते असल्यामुळे कवीच्या मनामध्ये मातीविषयी जिव्हाळा व ओढ दिसून येते. त्यांच्या कवितांतून प्रीतिभावनेच्या चित्रणाबरोबरच शेतातील पीक, शेतमाल आणि बाजारभाव, शासनाची दृष्टी, सरकारी धोरणे ही आशयसूत्रेही पाहावयास मिळतात. तसेच त्यांनी विज्ञानयुगाचे परिणाम, धर्मांधता, जीवनविषयक तत्त्वज्ञान सांगून दुष्काळात शेतकऱ्यांना करावा लागणारा संघर्ष, त्यांचे दु:ख व वेदना, त्यांची होणारी पिळवणूक यांना वाचा फोडली आहे. कवितेतून कवीने शेतकऱ्यास अन्यायाविरुद्ध बंड करण्यास प्रवृत्त केले आहे. अशारितीने सुमंतांच्या गेय कवितेची आशयसूत्रे अभ्यासली आहेत.

**'नारायण सुमंत यांच्या गेय कवितेचे वाङ्मयीन विशेष'** या तिसऱ्या प्रकरणामध्ये सुमंतांच्या गेय कवितेचे वाङ्मयीन विशेष अभ्यासण्यात आले आहेत. सुमंतांनी गेय कवितेत निसर्ग प्रतिमांचा वापर केला असून त्यांच्या प्रतिमेचे ताजेपणा, उत्कटता, आवाहकता असे गुणधर्म सांगता येतील. तसेच त्यांनी स्पर्शात्मक, गंधात्मक, दृश्यात्मक, श्रवणात्मक अशा प्रतिमांचा अचूक वापर केल्याने त्यांची गेय कविता आशयघन बनली आहे.

सुमंतांच्या गेय कवितेचा रचनाबंध हा विविधांगी असून त्यांनी ओवी, अभंग या छंदाबरोबरच लावणी, भारूड, शेतकरी गीत, भलरी हे काव्यप्रकार हाताळले आहेत. सुमंतांच्या गेय कवितेची भाषाशैली ही मिताक्षरी व ग्रामीण असल्याने सौंदर्याची अभिव्यक्ती व वास्तवाचे सहज दर्शन करणारी आहे. तसेच साधी सोपी, ओघवती भाषा, उपरोधिकता, गेयता व नादमाधुर्य, प्रासादिकता, विशेषणांचा व क्रियापदांचा

कलात्मक वापर ही त्यांच्या कवितेची भाषावैशिष्ट्ये सांगता येतील. ग्रामीण शब्दकळा हा तिचा महत्त्वाचा विशेष होय. अशाप्रकारे या प्रकरणात नारायण सुमंतांच्या गेय कवितांचे वाङ्मयीन विशेष अभ्यासले आहेत.

**'नारायण सुमंत यांच्या गेय कवितेचे वेगळेपण'** या चौथ्या प्रकरणामध्ये सुमंत यांच्या कवितेचे वेगळेपण शोधण्याचा प्रयत्न केला आहे. सुमंतांचे समकालीन असणारे विठ्ठल वाघ, इंद्रजित भालेराव, शंकर बडे, ज्ञानेश डोंगरे, प्रकाश घोडके यांच्या गेय कवितांच्या पार्श्वभूमीवर सुमंतांचे वेगळेपण प्रस्तुत प्रकरणात मांडले आहे. सुमंतांची कविता आशयाच्या, भाषाशैलीच्या व रचनाबंधाच्या बाबतीत वेगळी ठरते. इतर कवींच्या कवितांचे आशय व सुमंतांच्या कवितेचे आशयसूत्र जरी सारखे असले तरी सुमंत अधिक रोखठोकपणे व उपरोधिक शैलीत मांडताना दिसून येतात. इतर कवींनी लावणी, भारूड हे सहसा न वापरलेले काव्यप्रकार सुमंतांनी गेय कवितांसाठी वापरलेले असल्याने त्यांचे हे वेगळेपण सहज लक्षात येते. या पार्श्वभूमीवर सुमंतांचे वेगळेपण प्रस्तुत प्रकरणात अभ्यासण्यात आले आहे.

प्रस्तुत लघुप्रबंधाच्या **'उपसंहार'** या पाचव्या प्रकरणामध्ये पहिल्या प्रकरणापासून ते चौथ्या प्रकरणापर्यंतचा स्थूल आढावा घेतला आहे व अभ्यासाअंती हाती आलेले निष्कर्ष नोंदवण्यात आले आहेत.

**निष्कर्ष :**

१. नारायण सुमंतपूर्व गेय कवितेचा आढावा घेतल्यानंतर असे लक्षात येते की, संतवाङ्मयातील गेय कवितेपेक्षा, आजच्या कालखंडात गेय कविता जास्त प्रमाणात लिहिली जात नाही. आधुनिक काळात मुक्तछंदाचा आधिक्याने होणारा वापर हे त्याचे कारण सांगता येईल. काही कवींच्या कविता मात्र गेय स्वरुपाच्या आहेत. त्यामध्ये नारायण सुमंत यांचा गेय कवितेचा मोलाचा वाटा दिसून येतो.

२. सुमंत यांची गेय कविता ही लय, नाद, ताल यांनी युक्त असून तिच्यात अंत:संगीत व बाह्य:संगीत ओतप्रोत भरलेले आहे.

३. रचनाबंधाचा विचार करता सुमंत यांनी भलरी, शेतकरी गीत, भारूड, लावणी असे विविध रचनाबंध हाताळलेले दिसून येतात. अभंग व ओवी छंदाचा वापर हे त्यांच्या कवितेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य सांगता येते.

४. नारायण सुमंत यांची कविता ही 'गेय' असली तरी आशयाच्या बाबतीत कृषिजीवन व निसर्ग यापासून ती वेगळी होत नाही. प्रामुख्याने शेतकऱ्यांचे दु:ख, वेदना, शेतशिवार व पंढरी यांचे अतूट नाते, पिके, निसर्ग, दलाली, दुष्काळ, सरकारी धोरणे व योजना, विज्ञानयुगाचे परिणाम, जीवनविषयक तत्त्वज्ञान या आशयाची ही कविता आहे.

५. शेतकऱ्यांच्या दु:ख वेदनेला वाचा फोडून शेतकऱ्यांच्यामध्ये आत्मभान व बंडखोरवृत्ती जागी करण्यात कविता यशस्वी झाल्याचे दिसते.

६. कवी आपल्या गेय कवितेतून कृषिजीवन चित्रित करत असताना मातीशी कधी नाळ तोडत नाही. या कवितेवर संतसाहित्याचा विलक्षण प्रभाव असल्याचे लक्षात येते.

७. सावता माळ्याप्रमाणे शेत हेच पंढरपूर समजून शेतीत राबणारा हा कवी १९८० नंतरच्या कवितेत आपले वेगळेपण टिकवून आहे.

८. कवी आपल्या कवितेतून शेतकऱ्यांना पिळणाऱ्या समाजातील लोकांविषयी व सरकारच्या कूचकामी धोरणाविषयी एकप्रकारे निषेध नोंदवतो.

९. सुमंतांच्या गेय कवितेचे वाङ्‌मयीन विशेष अभ्यासल्यानंतर जास्त प्रमाणात अनुप्रास व यमकांचा वापर, अनुनादात्मक शब्द, यामुळे ही कविता अधिक 'गेय' बनली आहे असे दिसून येते.

१०. निसर्ग प्रतिमांचा अचूक व मुक्तहस्तपणे वापर हे या कवितेचे वेगळेपण सांगता येते. तसेच इंग्रजी शब्दांचा वापर, विशेषणे, क्रियापदे यांचा कलात्मक वापर हीदेखील वैशिष्ट्ये सांगता येतील. तसेच अनेक कवितांना धृपद हे असतेच हे तिचे वेगळेपण मांडता येते.

११. निसर्ग प्रतिमांच्या साह्याने स्त्रीरूपाची केलेली सौंदर्यात्मक वर्णने बहारदार आहेत. हा निसर्ग मानवी भावभावनांसह येतो. त्यात कोठेही उत्तानपणा येत नाही.

या निष्कर्षानंतर परिशिष्टामध्ये संदर्भग्रंथ सूची देण्यात आली आहे व नारायण सुमंतांची मुलाखत जोडली आहे. अशाप्रकारे एकूण पाच प्रकरणांमध्ये **'नारायण सुमंत यांच्या गेय कवितेचा अभ्यास'** ('नारायण पासष्टी' च्या अनुषंगाने) हा लघुप्रबंध पूर्ण केला आहे.

■ ■ ■